POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२८९ ● मुंबई, बुधवार, २१ मे २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## शपथविधीनंतर भुजबळ थेट मंत्रिमंडळ बैठकीत

# मुख्यमंत्र्यांनी घेतले ८ महत्त्वाचे निर्णय



- कारंजा, जिल्हा वाशिम येथे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर स्थापन करण्याचा निर्णय. यासाठी एकूण २८ पदनिर्मितीला तसेच १.७६ कोटींच्या खर्चाला मंजुरी
- बायोमिथेनेशन तंत्रज्ञानाचा वापर करुन कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी मे. महानगर गॅस लिमिटेड यांना बृहन्मुंबई महापालिकेच्या अखत्यारीतील देवनार येथील भूखंड सवलतीच्या दरात भाडेपट्ट्याने उपलब्ध करुन देणार
- उद्योग विभागाच्या अंतर्गत धोरण कालावधी संपुष्टात आलेल्या धोरणांतर्गत विभागाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावांना मंजुरी
- राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर 'माझे घर-माझे अधिकार' हे ब्रीद. ७० हजार कोटींची गुंतवणूक येणार, झोपडपट्टी पुनर्वसन ते पुनर्विकास असा सर्वांगीण कार्यक्रम
- सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजना, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे या प्रकल्पाच्या ५३२९.४६ कोटी रुपयांच्या सुधारित खर्चास मान्यता. ५२,७२० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार
- अरुणा मध्यम प्रकल्पांतर्गत मौजे हेत, तालुका वैभववाडी जिल्हा सिंधुदुर्ग या प्रकल्पासाठी २०२५.६४ कोटी रुपयांच्या सुधारित खर्चास मान्यता. ५३१० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार
- पोशिर प्रकल्प, तालुका कर्जत जिल्हा रायगड या प्रकल्पाला ३९४.१३ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता.
- शिलार तालुका कर्जत जिल्हा रायगड या प्रकल्पाला ४८६९.७२ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता.

**■मुंबई। प्रतिनिधी :** आज राज्य मंत्रिमंडळाची बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात संपन्न झाली. आजच्या मंत्रिमंडळातील बैठकीत ८ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. मंत्रिमंडळ बैठकीत जलसंपदा विभागात ४, विधी व न्याय विभागात एक, नगरविकास विभागात एक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागात एक आणि गृहनिर्माण विभागात एक असे एकूण ८ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. आज राज्यातील ओबीसी नेते आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे आमदार छगन भुजबळ यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. शपथविधी सोहळ्यानंतर आज पहिल्यांदाच त्यांनी हजेरी लावली.

# मान्सूनपूर्व पावसाने मुंबई-पुण्याला झोडपले

## मुंबईत गडगडाटासह मुसळधार बरसला, पुण्यातील रस्त्यांना नदीचं स्वरूप





**येत्या ४ दिवसात मुसळधार पावसाची शक्यता**

अरबी समुद्रात कमी दाबाचं क्षेत्र निर्माण होत असल्यानं त्याचा प्रभाव मुंबईसह महाराष्ट्रात दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रावर दिसणार आहे. त्यामुळं येत्या २२ मे ते २४ मे या कालावधीत अनेक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**■मुंबई। प्रतिनिधी :** राज्यभर अनेक ठिकाणी मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली असून मुंबई आणि पुण्याला चांगलेच झोडले आहे. मुंबईतील अनेक ठिकाणी विजांच्या गडगडाटासह पाऊस झाला. तर पुण्यातील अनेक रस्त्यांना नदीचं स्वरुप आल्याचं दिसून आलं. मंगळवारी रात्री झालेल्या पावसामुळे पुण्यातील स्वारगेटमध्ये पाणीच पाणी झाले. त्यातच लाईट गेल्यामुळे प्रवाशांना वाट काढून बसच्या दिशेने जावे लागले.

मुंबई आणि मुंबई उपनगरासह आसपासच्या महानगरांना मंगळवारी संध्याकाळपासून मुसळधार पावसानं झोडपून काढलं. विजांचा लखलखाट आणि ढगांच्या गडगडाटासह पडलेला हा पाऊस धड-की भरवणारा होता. त्यात संध्याकाळच्या सुमारास सारा नोकरदार वर्ग आपापल्या कार्यालयांमधून घराच्या दिशेनं निघाला होता. अचानक आलेल्या पावसानं त्या साऱ्यांची मोठी तारांबळ उडवली. अचानक आलेल्या तुफान पावसामुळे अंधेरी सब वे पाण्याखाली गेला होता. काही तासाच्या विश्रांतीनंतर पश्चिम उपनगरात रात्री पुन्हा जोरदार पावसाला सुरुवात झाली.

**पुण्यात गाड्या वाहून गेल्या**

पुणे शहर आणि उपनगरामध्ये मंगळवारी संध्याकाळपासून झालेल्या जोरदार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं. मुसळधार पावसामुळे अनेक भागात पाणी साचल्याचा वाहतुकीवर मोठा परिणाम झाला. शिवाजीनगर, सदाशिव पेठ, सहकार नगर, धनकवडी, कात्रज, कोंढवा, खडकवासलासह अनेक भागात अधिक पावसाची नोंद झाली. पावसामुळे सिंहगड रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचलं होतं. त्यामुळे काहीवेळ वाहतूक कोंडीही झाल्याचं दिसून आलं.

अचानक आलेल्या या मुसळधार पावसाचा नागरिकांनाही फटका बसला. या पावसाचं पाणी काही घरांमध्येदेखील शिरल्याचं दिसून आलं. मुसळधार पावसामुळे पुण्यातील रस्त्यांना नदीचं स्वरूप प्राप्त झालं होतं. जोरदार पावसामुळे आलेल्या पाण्याच्या लोंढ्यात, अनेक गाड्या वाहून गेल्या.

**राज्यभर पावसाची हजेरी**

राज्यभरात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस सुरू झाला आहे. मुंबईसह कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात पावसानं हजेरी लावली. मे महिन्याच झालेल्या दमदार पावसाच्या एण्ट्रीमुळे नागरिकांची तारांबळ उडाल्याचं चित्र आहे. रत्नागिरी, सातारा, सोलापूरसह वर्ध्यातही मान्सूनपूर्व पाऊस झाला. दरम्यान पुढचे चार ते पाच दिवस राज्यात पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# महाराष्ट्रातील कोरोना रुग्णसंख्येत वाढ... सरकार घेणार मोठा निर्णय



**मंत्रिमंडळ बैठकीत मोठ्या निर्णयाची शक्यता**

राज्यमंत्रिमंडळाची सकाळी ११.३० वाजता मंत्रालय येथे बैठक होणार आहे. पुण्यात कोरोनाचा रुग्ण आढळल्याने मंत्रिमंडळ बैठकीत यावर निर्णय घेण्याची शक्यता आहे. तसेच राज्यात अवकाळी पावसाने शेतीमालाचे नुकसान झाले आहे. यावरही शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत निर्णय घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. महाराष्ट्राबरोबरच तामिळनाडू आणि केरळमध्येही कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्याचं दिसून येत आहे.

**■मुंबई। प्रतिनिधी :** कोरोनाचे मुंबईत ५६ रुग्ण सक्रिय आहेत. हे सर्व रुग्ण मुंबई महापालिकेच्या हद्दीतील आहेत, तर राज्यातील इतर जिल्ह्यांपैकी केवळ पुण्यात नव्याने रुग्ण आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. मुंबईपाठोपाठ पुण्यातही कोरोनाचा पहिला रुग्ण आढळून आला आहे. पुण्यातील ८७ वर्षीय वृद्धाला कोरोनाची लागण झाली आहे. मुंबईनंतर आता पुण्यातही कोरोनाचा शिरकाव झाला असून शहरातील एका खाजगी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या ८७ वर्षीय पुरुषाला कोरोना विषाणूची लागण झाल्याचे समोर आलं आहे. यंदाच्या वषार्तील पुण्यातील हा पहिलाच रुग्ण असल्याने आरोग्य यंत्रणेत खळबळ उडाली आहे.

**मे महिन्यात रुग्णसंख्येत किंचित वाढ**

या वर्षी जानेवारीपासून आतापर्यंत कोरोनाचे ८७ रुग्ण आढळले होते. त्यापैकी ३१ बरे झाल्याने सध्या ५६ जणांवर घरीच उपचार सुरू आहेत. सिंगापूर आणि हाँगकाँगमध्ये कोरोना रुग्णांची संख्या वाढत आहे. परंतु, महाराष्ट्रात सध्या ५७ रुग्ण सक्रिय असून, यापैकी केवळ एक रुग्ण पुण्यात असून उर्वरित सर्व रुग्ण राजधानी मुंबईत आहेत. त्यामध्ये मे महिन्यात किंचित वाढ झाली असली, तरी ती संख्या एखाद्या ठिकाणावरून नसून, विखुरलेल्या स्वरूपातील आहे, असेही आरोग्य खात्याने स्पष्ट केले आहे.

**घाबरून जाण्याचे कारण नाही**

कोरोना विषाणू सध्याचा सौम्य स्वरूपाचा उपप्रकार असल्याने घाबरून जाण्याचे कारण नसल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांचे म्हणणे आहे. याआधी जानेवारीत दोन, फेब्रुवारीमध्ये एक आणि एप्रिलमध्ये चार रुग्णांचे निदान झाले होते. मार्चमध्ये एकही कोरोना रुग्ण आढळून आला नव्हता.

**या वर्षी कोरोनाने एकाही रुग्णाचा मृत्यू नाही**

आरोग्य विभागाने सोमवारी ४६ चाचण्या केल्या. त्यापैकी आरटीपीसीआर चाचण्यांची संख्या १५ होती, तर रॅपिड चाचण्यांची संख्या ३१ होती. दरम्यान, २०२४ मध्ये चार लाख ८४ हजार ३५२ कोरोना तपासण्या केल्या होत्या. त्यापैकी पाच हजार ५२८ रुग्ण पॉझिटिव्ह आढळले असून, त्यापैकी ३५ रुग्णांचा मृत्यू झाल्याची नोंद केली आहे. मात्र, या वर्षी कोरोनाने एकाही रुग्णाचा मृत्यू झाला नाही.

# कल्याणमध्ये इमारतीचा स्लॅब कोसळून मोठी दुर्घटना, ६ जणांचा मृत्यू



**मृतांची नावं :**

प्रमिला साहू ५८ , नामस्वी शेलार १.५, सुनीता साहू ३७ , सुजाता पाडी ३२, सुशीला गुजर ७८, व्यंकट चव्हाण ४२

**जखमींची नावं :**

अरुणा रोहिदास गिरणारायन ४८, शरवील श्रीकांत शेलार ०४, विनायक मनोज पाधी ४.५, यश क्षीरसागर १३, निखिल खरात २७, श्रद्धा साहू १४

**■कल्याण। प्रतिनिधी :** कल्याणमध्ये मोठी दुर्घटना घटना घडली आहे, इमारतीचा स्लॅब कोसळला, या घटनेत ६ जणांचा मृत्यू झाला आहे, तर काही जण ढिगाऱ्या खाली अडकल्याची माहिती समोर आली आहे. मृतांमध्ये तीन महिलांसह एका दीड वर्षांच्या चिमुकलीचा समावेश आ-हे. श्री सप्तश्रृंगी असं स्लॅब कोसळलेल्या या इमारतीचं नाव आहे. घटनेबाबत अधिक माहिती अशी की, कल्याणमधील श्री सप्तश्रृंगी इमारतीमध्ये स्लॅब कोसळल्याची घटना घडली आहे. या घटनेत चार जणांचा मृत्यू झाला आहे, तर काही जण ढिगाऱ्याखाली अडकले आहेत. मृतांमध्ये तीन महिलांसह एका दीड वर्षांच्या चिमुकलीचा स-विश आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, पालिका अधिकारी आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. गेल्या तीन तासांपासून या ठिकाणी बचाव कार्य सुरू असून आतापर्यंत आठ जणांना ढिगाऱ्याखालून बाहेर काढण्यात आलं आहे. त्यातील चार जणांचा मृत्यू झाला असून, चार जणांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. अजूनही काही लोक ढिगाराखाली अडकल्याची शक्यता असल्यानं रेस्क्यू ऑपरेशन सुरुच आहे.

**बाहेर गेला आणि जीव वाचला, मित्र अडकला**

दरम्यान ही दुर्घटना जेव्हा घडली तेव्हा त्याच इमारतीमध्ये जितेंद्र गुप्ता आणि व्यंकट चव्हाण हे चौथ्या मजल्यावर कोबा करण्याचं काम करत होते. जितेंद्र हे दुपारी जेवण्यासाठी बाहेर गेले, याचदरम्यान हा स्लॅब कोसळला. जितेंद्र हे जेवणासाठी बाहेर गेल्यानं त्यांचा जीव वाचला आहे. मात्र त्यांचे मित्र व्यंकट हे मलब्याखाली अडकले आहेत. गेल्या दोन तासांपासून या ठिकाणी रेस्क्यू सुरू असून आतापर्यंत आठ जणांना बाहेर काढण्यात आलं आहे, त्यातील चार जणांचा मृत्यू झाला आहे, तर चार जणांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. अजूनही तीन ते चार जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची माहिती समोर येत आहे. घटनास्थळी बचाव कार्य सुरू आहे. मलब्यात अडकलेल्या लोकांना बाहेर काढलं जात आहे.

# सीएसएमटी-अंबरनाथ लोकलच्या जनरल डब्ब्यात पुरुषाकडून महिलेला मारहाण

**व्हिडीओमध्ये काय आहे?**

जनरल डब्यामध्ये एक पुरुष प्रवाशी एका महिला प्रवाशाला मारहाण करत असल्याचं या व्हिडिओमध्ये दिसून येत आहे, मात्र अजून कोणत्याही रेल्वे स्थानकावर याबाबत तक्रार दाखल झाली नाही. विंडो सीटला बसलेल्या एका कुटुंबातील सदस्याला महिलेने शिवी दिली असा आरोप करत कुटुंबातील एक व्यक्ती तिला हातातील हॅण्ड बॅगने हाणामारी करण्यास सुरुवात करतो. नंतर ही व्यक्ती या महिलेवर धावून जाते. ?तू आईवरुन शिवी कशी दिली?? असा जाब ही व्यक्ती महिलेला विचारताना दिसत आहे. दुसरीकडे अनेक प्रवासी या व्यक्तीला महिलेवर हात उचलू नको असं सांगत मारहाण करण्यापासून रोखण्याचा प्रयत्न करताना दिसतात.



**■मुंबई। प्रतिनिधी :** मुंबईची लाईफ लाइन समजली जाणारी लोकल ट्रेन हा विषय मुंबईत नोकरीसाठी रोज अप-डाऊन करणाऱ्यांसाठी जिव्हाळ्याचा विषय आहे. मात्र याच मुंबई लोकलमधील एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. खरं तर मुंबई लोकलमध्ये होणारे वाद आणि भांडणं हा मुंबईकरांसाठी फार नवीन विषय राहिला नाही. अगदी धक्का का मारलापासून ते जागेसाठीही जोरदार भांडणं लोकल ट्रेनमध्ये होतात. मात्र सध्या समोर आलेल्या एका व्हिडीओमध्ये जनरल डब्यामध्ये पुरुषाने महिलेला मारहाण केल्याचा घटनाक्रम कॅमेरात कैद झाला आहे.

**अंबरनाथ लोकलमधील प्रकार**

मिळालेल्या माहितीनुसार, व्हायरल झालेला व्हिडिओ हा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस म्हणजेच सीएसएमटीवरुन सुटणाऱ्या अंबरनाथ लोकल ट्रेनमध्ये घडला आहे. या ट्रेनमधील जनरल डब्यात जागेच्या वादातून एका पुरुषाने चक्क महिला प्रवाशाला मारहाण केल्याचा प्रकार समोर आला आहे. मारहाणीचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. ही घटना नेमकी ट्रेन कुठे असताना घडली आणि किती वाजता घडली याची माहिती समोर आलेली नाही. मारहाण करणारी आणि ज्या महिलेला मारहाण केली जात आहे ती महिला कोण आहे यासंदभार्तील तपशीलही समोर आलेला नाही.

**कठोर शिक्षेची मागणी**

मात्र हा व्हिडीओ पाहणाऱ्या प्रत्येकाने या प्रकरणामध्ये दोषीविरोधात कठोर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी करताना दिसत आहे. सामान्यपणे पुरुषांच्या डब्यामध्ये पुरुष प्रवाशांमध्ये धक्काबुक्की होणं किंवा हाणामारी होणं अशी बाब सामान्य आहे. तसेच महिलांच्या डब्ब्यामध्येही अनेकदा अगदी हाणामारीपासून ते एकमेकींचे केस ओढण्यापर्यंत भांडणं झाल्याचे व्हिडीओ यापूर्वीही समोर आले आहेत. मात्र धावत्या लोकल ट्रेनमध्ये एखाद्या पुरुषाने जनरल डब्यामध्ये महिलेला मारहाण करतानाचा हा व्हिडीओ फारच धक्कादायक असल्याचं अनेकांनी म्हटलं आहे.

**महिला जनरल डब्यातही सुरक्षित नाहीत का?**

या व्हिडीओमुळे पुन्हा एकदा लोकल ट्रेनमधील महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा चर्चेत आल्याचं पाहायला मिळत आहे. सामान्यपणे महिलांच्या डब्यातील वाढत्या गुन्हेगारीच्या घटना पाहून महिलांच्या डब्यांमध्ये रात्री उशीरापर्यंत पोलीस कॉन्स्टेबल ठेवण्याचा निर्णय अनेक वर्षांपूर्वी घेण्यात आला असून त्याची अंमलजबावणीही केली. मात्र आता जनरल डब्यात असा प्रकार घडल्याने महिला आता जनरलच्या डब्यातही सुरक्षित नाहीत का? असा सवाल उपस्थित केला आहे.

## एकाचवेळी ३ ठिकाणी होर्डिंग कोसळले

# अनेक वाहने होर्डिंगखाली अडकली





मान्सून पूर्व पावसाने राज्यभरात धुमाकूळ घातला आहे. पुढील पाच दिवस राज्यात विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस बरसणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवलाय. कोकणासह मध्य महाराष्ट्रात अतिमुसळधार पावसासाठी 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला असून विदर्भातही काही ठिकाणी पाऊस जोरदार बरसणारेय.पुणे शहरासह जिल्ह्यात आणि घाट परिसरात पुढील दोन दिवस हलका ते मध्यम अवकाळी पावसाचा इशारा पुणे हवामान विभागाने दिलाय. 'यलो अलर्ट' जारी करण्यात आलाय.

**■नाशिक। प्रतिनिधी :** मागील दोन दिवसांपासून सुरु असलेल्या मुसळधार पावासामुळे पुण्यात मोठी दुर्घटना घडली आ-हे. एकाचवेळी 3 ठिकाणी होर्डिंग कोसळले आहेत. या होर्डिंगखाली अनेक वाहने अडकल्याची भिती व्यक्त केली जात आहे. होरडिंग कोसळल्याच्या दुर्घटनेमुळे पुण्यात प्रचंड वाहतुक कोंडी झाली. घटनास्थळी होर्डिंग हटवण्याचे काम सुरु आहे.

पुणे अहिल्यानगर महामार्गावर होर्डिंग कोसळले आहे. भर चौकातच हे होर्डिंग कोसळले. होर्डिंगखाली अनेक दुचाकी अडकल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. पुण्यात मुसळधार पावसात होर्डिंग कोसळले. सात ते आठ दुचाकी बोर्डिंग खाली अडकल्या. कोणीही जखमी नाही. पुणे अहिल्यानगर रस्त्यावर वाघोली जवळ सणसवाडी येथे होर्डिंग कोसळले. पुण्यात आणखीन एक ठिकाणी मुसळधार पावसामुळे होर्डिंग कोसळले आहे. सणसवाडी आणि फुरसुंगी मंतरवाडी चौक असा दोन ठिकाणी होर्डिंग कोसळले आहे. फुरसुंगीतील मंतरवाडी चौकातही पावसामुळे फ्लेक्स कोसळला आहे. पुण्यात पावसाने पाणीच पाणी पुण्यात काल रात्री अवघ्या एक तास झालेल्या पावसाने पुण्यातील चार ठिकाणी पाणी तुंबले. विमानतळ ...कात्रज ..हडपसर ..धानोरी भागात मुसळधार पावसामुळे पाणी साचलेले होते. पुणे शहरासह जिल्ह्यात आजही मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. हवामान विभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. विजांच्या कडकडाटासह काही ठिकाणी जोरदार सरी कोसळण्याची शक्यता आहे. अवकाळी पावसाने अनेक ठिकाणी पीकांचे नुकसान झाले आहे.

# समलैंगिक डेटिंग ॲपवरून भेटायला बोलावत तरुणांची लुटमार... 'असा' झाला सुशिक्षित टोळीचा भांडाफोड



**लुटमार करून पलायन**

तरुणाने अनेकदा विनवण्या केल्या, मात्र आरोपी टोळीने त्याच्याकडून पैशांची मागणी केली. त्यासाठी त्यांनी त्याला कुटुंबीयांना अपघात झाल्याचे कारण सांगून पैसे मागण्यास भाग पाडले. तरुणाच्या आईने तीन हजार रुपये पाठवले, तेव्हा आरोपींनी जवळच्या पेट्रोल पंपावरून ती रोख रक्कम काढून घेत पलायन केले.

**■छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी:** समलैंगिकांसाठी असलेल्या डेटिंग ॲपवर बनावट प्रोफाइल तयार करून तरुणांना लुटणारी टोळी सध्या छत्रपती संभाजीनगर शहरात सक्रिय झाल्याचे समोर आले आहे. गेल्या नऊ महिन्यांत या टोळीने १० हून अधिक तरुणांना आपल्या जाळ्यात ओढून लुटले आहे. मात्र दौलताबादमधील एका तरुणाने धाडस करून पोलिसांकडे तक्रार दाखल केल्यानंतर या प्रकाराचा पदार्फाश झालाय. या तक्रारीच्या अनुषंगाने पोलिसांनी तपास करत वडगाव कोल्हाटी परिसरातून तिघांना बेड्या ठोकल्या आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, दौलताबादमध्ये हॉटेल व्यवसाय करणाऱ्या २५ वर्षीय तरुणाला १६ मे रोजी फेसबुकवर समलैंगिक डेटिंगसाठीच्या 'वॉल ॲप'ची जाहिरात दिसली. त्याने ॲप इन्स्टॉल केल्यावर एका प्रोफाइलधारकाकडून मेसेज आला. त्या व्यक्तीने आपण शहरातीलच असल्याचे सांगितल्यावर दुपारी भेटण्याचे ठरले. दुपारी २ वाजता तीसगाव फाट्यावर ते दोघे भेटले. तेथून त्या व्यक्तीने पीडित तरुणाला करोडी टोलनाका परिसरात नेले. काही वेळात त्याचे दोन साथीदार तेथे आले आणि त्यांनी तरुणाला मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यांनी तरुणाचा व्हिडीओ मोबाईलमध्ये चित्रीत करत, तू समलैंगिक असल्याचे व्हायरल करतो, असे धमकावले.

**तीन आरोपी जेरबंद**

या घटनेनंतर पीडित तरुणाने तात्काळ पोलिसांकडे धाव घेतली. पोलीस उपायुक्त नितीन बगाटे यांना याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी दौलताबाद पोलीस ठाण्याच्या निरीक्षक रेखा लोंढे आणि उपनिरीक्षक कृष्णा घायाळ यांना तपासाची जबाबदारी सोपवली. त्यानंतर आरोपींच्या दुचाकीच्या वर्णनाच्या आधारे शोधमोहीम सुरू करण्यात आली. तपासात दुचाकी वडगाव कोल्हाटी परिसरातील असल्याची माहिती मिळाली. त्या आधारावर उपनिरीक्षक कृष्णा घायाळ, सहायक फौजदार पाटेकर आणि अंमलदार कैलास जाधव, महेश घुगे, ज्ञानेश्वर कोळी, अविनाश बरवंट यांच्या पथकाने संबंधित परिसरात जाऊन शोध घेतला आणि अखेर आरोपींच्या घरावर धाड टाकून राहुल राजू खांडेकर (२०), आयुष संजय लाटे (२१) आणि शिवम सुरेश पवार (२४, तिघेही रा. वडगाव कोल्हाटी) यांना अटक केली आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# संविधानाचे ‘सर्वोच्च’ संरक्षण

भारताच्या सरन्यायाधीशपदी महाराष्ट्राचे सुपुत्र भूषण गवई यांची निवड झाल्यानंतर महाराष्ट्राच्या समृद्ध, अभ्यासपूर्ण आणि वैचारिक परंपरेचा अभिमानास्पद वारसा पुढे गेल्याचा आनंद व्यक्त व्हायला हवा होता. मात्र महाराष्ट्राच्या काही घटकांची या ऐतिहासिक घटनेप्रती असलेली उदासीनता राज्याच्या परिवर्तनाच्या परंपरेला आडवी जाणारी आहे. सरन्यायाधीश भूषण गवई यांचा मुंबईत ह्यबार कौन्सिल ऑफ महाराष्ट्रह्नकडून गौरव करण्यात आला. यावेळी सरन्यायाधीशांनी राज्याच्या प्रशासकीय घटकांच्या उदासीनतेविषयी मत व्यक्त केले. यावेळी राज्याचे प्रशासकीय प्रमुख आणि पोलीस यंत्रणेचे प्रमुख उपस्थित नसल्याविषयी तसेच प्रोटोकॉल न पाळण्यात आल्याविषयी भाष्य केले. सरन्यायाधीश गवई यांनी यंत्रणेविषयी नाराजी व्यक्त करतानाच संविधान सर्वोच्च असल्याचेही स्पष्ट केले. सरन्यायाधीशांच्या या स्पष्टवक्तेपणामुळे त्यांचा भारतीय न्याययंत्रणेतील सर्वोच्च पदावरील यापुढची वाटचाल ही घटनात्मक मूल्यांचे रक्षण करणारी असण्याचा आशावाद व्यक्त होत आहे. ही भारतासाठी आणि महाराष्ट्रासाठीही महत्त्वाची स्वागतार्ह बाब आहे. भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या माध्यमातून महाराष्ट्राचा वाटाही सर्वोच्च असाच राहिला आहे. घटनेच्या मूलभूत ढाच्याचे रक्षण करण्यात महाराष्ट्र अग्रेसर राहिला आहे. सरन्यायाधीश भूषण गवई यांनी व्यक्त केलेल्या नाराजीमागे या परंपरेची काळजीच व्यक्त केली गेली आहे. सत्तेवर नियंत्रण ठेवण्याचे काम न्यायव्यवस्थेचे असल्याने सरन्यायाधीश यांनी कलम १४२ ची आठवण सत्तेला करून दिली आहे. राज्यघटनेने नेमून दिलेल्या सत्तेच्या धोरणात्मक कामांची अंमलबजावणी करण्याचे काम प्रशासनाचे असते, त्यासाठी वेळोवळी सत्तेचा विरोधही स्वीकारावा लागतो. त्यासाठी प्रशासनाला राज्यघटनेने स्वायत्ततेचे अधिकार दिलेले असतात. केवळ राजकीय सत्तेच्या हितासाठी प्रशासनाने आपली ही स्वायत्तता धोक्यात आणू नये, संविधान हे सरकार आणि सत्तेच्या यंत्रणांपेक्षा सर्वोच्च असल्याची आठवण सरन्यायाधीशांनी म्हणूनच करून दिली असावी. सरन्यायाधीशांनी ज्या १४२ कलमाचा उल्लेख आपल्या भाषणात केला, हे कलम राज्यघटनेच्या मूलभूत ढाच्याचे संरक्षण करणारे आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष आणि असाधारण अधिकारांशी संबंधित हे कलम आहे. या कलमामुळे सर्वोच्च न्यायालयाला त्याच्या कार्यक्षेत्रात न्यायाच्या पूर्ण हितासाठी आवश्यक ते आदेश, निर्देश देण्याचे अधिकार उपलब्ध झालेले आहेत. या कलमानुसार न्यायाची सुनिश्चितता करण्यावर भर देण्यात आलेला आहे. त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाला संविधानाने दिलेल्या अधिकारातून सत्ता, सरकारे तसेच राजकीय व्यवस्था तसेच प्रशासनावरही न्यायालयाकडून अंकुश ठेवला जातो. न्यायाचे तत्व घटनेच्या चौकटीत सुनिश्चित करणे त्याचे त्यासाठी कायद्याच्या रक्षणात कलम १४२ महत्त्वाचे आहे. न्यायपालिकेचे महत्त्व अधोरेखित करताना सरन्यायाधीश भूषण गवई यांनी न्यायपालिकेच्या अधिकारांचे संरक्षण सुदृढ लोकशाहीसाठी आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे. यातून सरन्यायाधीशांनी न्यायपालिका कुठल्याही दबावाला बळी पडणार नाही, असा गर्भित इशाराही यातून दिल्याचे स्पष्ट व्हावे, तसेच प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणांनाही त्यांच्या कर्तव्याची जाणीव सरन्यायाधीशांनी करून दिली आहे. ज्या प्रकरणात कायद्याच्या कक्षेच्या पलीकडे जाऊन निकाल देण्याची गरज निर्माण होते, अशा वेळी हे कलम न्यायालयाला शक्ती पुरवण्याचे काम करते. लोकशाही आणि लोकांच्या हितासाठी असलेल्या निर्णयप्रक्रियेत हे कलम न्यायव्यवस्थेच्या सद्सद्विवेकबुद्धीला आवाहन करते, यातून सरन्यायाधीशांनी न्यायपालिकेच्या स्वायत्ततेची आठवण प्रशासनाला करून दिली आहे. त्यासाठी त्यांनी केशवानंद भारती प्रकरणाचा उल्लेख केला, प्रशासन, विधिमंडळ, कायद्याची अंमलबजावणी करणार्या यंत्रणांच्या कार्यक्षेत्रात सत्तेचा अवाजवी हस्तक्षेप होणार नाही, याची काळजी घेण्याचे त्यांनी सुचवले, सोबतच यंत्रणांच्या घटनात्मक अधिकारांच्या रक्षणासाठी न्यायपालिका आपले अधिकार वापरू शकते, असा इशाराही त्यांनी दिला आहे. संविधानाच्या मूलभूत ढाच्याचे संरक्षण हा विषय सरन्यायाधीशांच्या भाषणाचा केंद्रबिंदू होता. सरन्यायाधीशांकडून सत्ता, राजकीय शक्ती, सरकारांची मनमानी, प्रशासनाकडून होणारी अडवणूक या सर्वांनाही हा इशारा होता. राज्यघटनेतील महत्त्वाच्या संस्थेचे प्रमुख राज्यात पहिल्यांदाच येत असतील आणि ती व्यक्ती त्याच राज्यातील असेल तर अशी वागणूक कितपत योग्य आहे? याचा विचार संबंधितांनी करावा, असे सरन्यायाधीशांनी सुचवले, सोबतच कलम १४२ चा उल्लेख करत न्यायालयाची स्वायत्तताही घोषित केली, हा इशारा केवळ प्रशासनातील संबंधित अधिकार्यांपुरता नसावा, असा विचार करण्यास वाव आहे. सरन्यायाधीशांनी चैत्यभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केल्यावर राज्यघटनेला ७५ वर्षे पूर्ण होत असताना देशाचा सरन्यायाधीश होण्याचा बहुमान मिळणे अभिमानास्पद असल्याचे म्हटले. राज्यघटनेचे तीन स्तंभ घटनात्मक चौकटीत काम करत असल्याचेही त्यांनी नमूद केले. सरन्यायाधीशांच्या भाषणात राज्यघटनेच्या मूलभूत ढाच्याचे संरक्षण आणि घटनेने यंत्रणांना नेमून दिलेल्या मयार्दा अधोरेखित करण्यात आल्या. या भाषणातून सरन्यायाधीशांची पुढील वाटचाल ही संविधान, पयार्याने लोकशाही, सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाच्या मूल्यांच्या रक्षणाच्या दिशेने होणार असल्याचा आशावाद सूचित झाला आहे. घटनेची चौकट अभेद्य ठेवण्याकरिता न्यायपालिका काम करेल, त्यासाठी न्यायव्यवस्थेला गृहीत धरता येणार नाही, असा संदेश त्यांच्या भाषणातून समोर आला आहे.

# न्यायप्रविष्ट आणि अभिव्यक्तीचा नवा अन्वयार्थ

**देश म्हणून आपण खुल्या न्यायालयाचे तत्त्व अंगिकारले आहे. जर न्यायालयात काय घडते आहे, हे सर्वसामान्य लोकांना समजत असेल, तरच या खुल्या न्यायालयाच्या तत्त्वाला अर्थ आहे. न्यायालयांमध्ये लोकांच्या रोजच्या जगण्यावर परिणाम करणाऱ्या खटल्यांवर सुनावणी सुरू असेल, तर तिथे नक्की काय घडते आहे, हे समजून घेण्याचा नागरिकांना अधिकार आहे. हा अधिकार अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराशी सुसंगत आहे. कारण मुळात काय घडते आहे, हे समजून घेतल्याशिवाय अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराला काहीच अर्थ नाही, हे समजून घेतले पाहिजे.**



न्यायप्रविष्ट हा शब्द आपल्या सगळ्यांच्या परिचयाचा. अनेक राजकारण्यांकडून तो खूप वेळा वापरलाही जातो. एखाद्या विषयावर न्यायालयामध्ये खटला प्रलंबित असेल, तर त्याबद्दल कोणतेही मत व्यक्त करताना सावधपणा बाळगला जातो. शक्यतो मत व्यक्तच केले जात नाही. ‘हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, त्यामुळे सध्या काही मत व्यक्त करता येणार नाही’, असे वाक्य राजकीय नेत्यांकडून पत्रकारांना ऐकवले जाते.

न्यायदानाची प्रक्रिया सुरू असताना आपल्या मतामुळे त्यावर काही परिणाम व्हायला नको, हाच उद्देश यामागे असतो. गेल्या अनेक वर्षांपासून हेच सुरू आहे. पण सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच एका खटल्यामध्ये या संदर्भात नवा दृष्टिकोन पुढे आणला. पत्रकार, माध्यमकर्मी, सोशल मीडियातील लेखक यांनी तो समजून घेतला पाहिजे.

न्यायदानाची प्रक्रिया सुरू असताना काही पथ्ये पाळली जातात. त्याचे प्रमुख कारण न्यायाधीशांना त्यांचे काम करताना कोणत्याही बाहेरील दबावाचा सामना करायला लागू नये. निष्पक्षपातीपणे आणि कायद्यातील तरतुदींना धरून न्यायदानाचे काम त्यांना करता यावे. आपल्या देशातील लोकशाही व्यवस्थेमध्ये न्यायालयांचे स्वातंत्र्य परमोच्च आहे. त्यासाठी विविध तरतुदी राज्यघटनेमध्ये करण्यात आल्या आहेत.

न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार उच्च आणि सर्वोच्च न्यायालयांना देण्यात आला आहे. राज्यघटनेतील अनुच्छेद १४२ अनुसार ‘संपूर्ण न्याय’ करण्याची ताकद सर्वोच्च न्यायालयाला देण्यात आली आहे. या सगळ्यातून न्यायालयांचे स्वातंत्र्य अधोरेखित होते. त्याचवेळी राज्यघटनेतील अनुच्छेद १९ (१) (अ) मध्ये देशातील प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिलेले आहे. लोकशाहीमध्ये अभिव्यक्तीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. जर लोकांना मुक्तपणे त्यांचे म्हणणे मांडता येत नसेल, तर त्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उपयोग नाही.

याच अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच उच्च न्यायालयाच्या एका निर्णयामुळे होत असल्याचे सांगत सर्वोच्च न्यायालयात एक खटला दाखल करण्यात आला होता. विकिमीडिया फाऊंडेशन विरुद्ध एएनआय मीडिया प्रायव्हेट लिमिटेड असा हा खटला. याच खटल्यावर सर्वोच्च न्यायालयाचे न्या. अभय ओक आणि न्या. उज्जल भूयान यांनी निकाल दिला. हे निकालपत्र लिहिताना न्यायालयाने जे विविध संदर्भ दिले, ते न्यायप्रविष्ट या शब्दांकडे बघण्याचा नवा दृष्टिकोन देणारे आहेत.

मुळात एखादी गोष्ट न्यायालयात प्रलंबित असेल, तर त्यावर भाष्य का करू नये, हे आधी समजून घेतले पाहिजे. न्यायदानाची प्रक्रिया सुरू असताना त्या विषयावर भाष्य केल्याने पूर्वग्रह निर्माण होण्याची शक्यता असते. ज्याचा न्यायदानावर परिणाम होऊ शकतो. न्यायाधीश हासुद्धा एक माणूसच आहे. त्यामुळे इतर माणसांप्रमाणे बाह्य गोष्टींचा परिणाम होणे अपेक्षित असते. याचसाठी एखादा खटला न्यायप्रविष्ट असेल, तर त्यावर शक्यतो भाष्य केले जाऊ नये, हा प्रघात आहे.

वर उल्लेख केलेल्या खटल्यामध्ये दिल्ली उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने विकिमीडिया फाऊंडेशनला आदेश दिले होते. या खटल्यासंदर्भात त्यांच्या व्यासपीठावर जे वेबपेज तयार करण्यात आले होते, त्यावर या खटल्यासंदर्भात विविध प्रतिक्रिया व्यक्त करण्यात येत होत्या. हा प्रकार न्यायप्रविष्ट खटल्यातील संकेतांच्या विरोधात आहे आणि न्यायालयाचा अवमान करण्यासारखा आहे, असे दिल्ली उच्च न्यायालयाने म्हटले होते. न्यायालयाच्या आदेशानंतर पुढील ३६ तासांच्या आत इंटरनेटवरून संबंधित वेबपेज हटविण्याचे आदेशात म्हटले होते. याच आदेशांना सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले.

सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली उच्च न्यायालयाचा आदेश रद्दबातल ठरविला. हे करताना न्यायालयाने काही महत्त्वाची निरीक्षणे नोंदविली. एखादा खटला न्यायप्रविष्ट असेल, तरी त्याबद्दल माध्यमांमध्ये आणि सामान्य नागरिकांमध्ये सकारात्मक चर्चा घडली पाहिजे. लोकांमध्ये जी काही चर्चा होते, निरीक्षणे नोंदविली जातात, त्याबद्दल न्यायालयांनी कायम नकारात्मक भूमिका ठेवण्याची गरज नाही. शेवटी न्यायालये ही सुद्धा सार्वजनिक व्यवस्थेचाच एक भाग आहेत. देशातील लोकशाही आणि राज्यघटनेची चौकट टिकवून ठेवण्यासाठी माध्यमे आणि न्यायालये यांनी परस्परांना पूरक ठरेल, अशा पद्धतीने काम केले पाहिजे, असे मत सर्वोच्च न्यायालयाने नोंदविले.

एखादा खटला न्यायप्रविष्ट असेल आणि त्या खटल्यामध्ये माध्यमांनी किंवा त्रयस्थांनी कोणतेही मत व्यक्त केले तर त्यातून न्यायदानाच्या प्रक्रियेमध्ये अडथळा निर्माण होण्याची शक्यता असेल, तरच संबंधित खटल्यामध्ये न्यायालय माध्यमांना किंवा त्रयस्थांना खटल्याचा निकाल लागेपर्यंत कोणतेही मत न व्यक्त करण्यासंदर्भात आदेश देऊ शकतात.

हे आदेश अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराचा वापर निकालानंतर करण्यास संबंधितांना बांधील करतात. त्यामुळे जेव्हा खरंच त्याची गरज असेल, तेव्हाच न्यायालयाने त्याचा वापर केला पाहिजे. सरसकट सगळ्याच खटल्यामध्ये हा निकष लावता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

काही वर्षांपूर्वी सर्वोच्च आणि उच्च न्यायलायतील ठराविक खंडपीठांपुढील न्यायालयाच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण करण्यास सुरुवात झाली. त्यावेळीही यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवरील सुनावणीवेळी न्यायालयाने थेट प्रक्षेपणाचे समर्थन केले होते. आपण खुल्या न्यायालयाचे तत्त्व अंगिकारले आहे. जर न्यायालयात काय घडते आहे, हे सर्वसामान्य लोकांना समजत असेल, तरच या खुल्या न्यायालयाच्या तत्त्वाला अर्थ आहे.

न्यायालयांमध्ये लोकांच्या रोजच्या जगण्यावर परिणाम करणार्या खटल्यांवर सुनावणी सुरू असेल, तर तिथे नक्की काय घडते आहे, हे समजून घेण्याचा नागरिकांना अधिकार आहे. हा अधिकार अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराशी सुसंगत आहे. कारण मुळात काय घडते आहे, हे समजून घेतल्याशिवाय अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराला काहीच अर्थ नाही, असेही निरीक्षण न्यायालयाने नोंदविले.

प्रख्यात तत्त्ववेत्ता आणि कायदेतज्ज्ञ जेरेमी बेंथम यांनी न्यायालयाच्या कामकाजाची प्रसिद्धी करण्यामागे एका कारणाचा उल्लेख केला होता. ते कारण सुद्धा समजून घ्यायला हवे. न्यायाधीशांचा प्रामाणिकपणा टिकवून ठेवण्यासाठी न्यायालयाच्या कामकाजाची प्रसिद्धी व्हायला हवी, असे त्याने म्हटले होते. न्यायालयात काय घडते आहे, यावर माध्यमांमध्ये माहिती येत राहिली, तर त्याचा सकारात्मक परिणाम न्यायालयाच्या कामकाजावर होतो. यासाठी त्याची प्रसिद्धी व्हायलाच हवी, असे त्याने म्हटले होते.

न्यायालयांमध्ये काय घडते, तिथे कामकाज कशा पद्धतीने चालते, कायद्याचा अन्वयार्थ कशा पद्धतीने लावला जातो, हे जर मुक्तपणे सामान्य नागरिकांना कळू दिले जात असेल, तर त्याचा उपयोग लोकांचा न्यायालयांवरील विश्वास वाढविण्यासाठी होतो. त्यासाठीच नागरिकांना न्यायालयांमध्ये जे काही घडते आहे, त्याबद्दल सकारात्मकपणे आणि मुद्देसूदपणे आपली मते मांडता आली पाहिजेत. जिथे गरज असेल तिथेच त्यावर निर्बंध लादले गेले पाहिजेत, असे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालातून दिसून येते.

जर कोणी हेतुपूर्वक न्यायालयांना बदनाम करण्यासाठी त्यांच्यावर निराधार आरोप करीत असेल, लोकांमध्ये न्यायालयांबद्दल अविश्वास निर्माण होईल, असे काही करत असेल, तर संबंधितांविरोधात अवमानाचा खटला चालविण्याचा अधिकार न्यायालयांना नक्कीच आहे. पण हे तत्त्व सरसकटपणे सर्वच चर्चा, प्रतिक्रिया, भूमिका यांना लावता येणार नाही. न्यायदानाचे काम प्रभावीपणे करता यावे, यासाठी काही विशेषाधिकार न्यायालयांकडे नक्कीच आहेत. पण ते कधी आणि कसे वापरायचे याचे तारतम्य हे न्यायालयांनीच ठेवले पाहिजे.

अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच होईल आणि लोकांना न्यायालयांबद्दल, न्यायिक प्रक्रियेबद्दल आपले मतच मांडता येणार नाही, असे व्हायला नको. शेवटी न्यायालयेसुद्धा राज्यघटनेने निर्माण केलेल्या एका व्यवस्थेचाच भाग आहेत आणि त्याच राज्यघटनेने नागरिकांना काही मूलभूत अधिकार दिले आहेत. विशेष म्हणजे या मूलभूत अधिकारांचे रक्षण करण्याची जबाबदारी न्यायलयांवरच आहे. हे सगळे बिंदू जेव्हा आपण जोडतो, तेव्हा सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे स्वागतच करावेसे वाटते.

# असा या श्लोकाचा भावार्थ आहे...

**पहलगाम हल्ल्यानंतर ‘ऑपरेशन सिंदूर’ने भारताने आपली लष्करी ताकद सिद्ध केली. वॉशिंग्टन पोस्ट आणि न्यूयॉर्क टाइम्ससारख्या आंतरराष्ट्रीय माध्यमांनीही पाकिस्तानचे दावे फेटाळले. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली भारताने कठोर इशारा दिला. दहशतवादाविरोधात भारताने जागतिक पातळीवर प्रयत्न सुरू केले असून, विरोधी पक्षांनाही सहभागी करून घेतले आहे. बदलत्या भारताचा आत्मविश्वास आणि सैन्यबल यामुळे जगभर भारताचा दबदबा वाढत आहे.**




गेल्या आठ दिवसांतील अत्यंत वेगाने घडलेल्या घडामोडींचा आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या सारीपाटावर मोठा परिणाम होणार आहे. या घडामोडींतून बदलत्या भारताची ताकद साऱ्या जगाला दिसली, त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय राजकारण यापुढे महाशक्तींच्या लहरीनुसार एकांगी पद्धतीने चालणार नाही, हेही भारताने दाखवून दिले. शौर्यवान सैन्यदल आणि कणखर राष्ट्रप्रमुख असा संगम ज्या देशात होतो तो देश कोणतेही संकट सहज परतवून लावतो, हेच या घडामोडीतून दिसले आहे. पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानमधील आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केल्यानंतर भारत थांबेल, अशी पाकिस्तानची आणि महासत्तांचीही अटकळ होती. ही अटकळ खोटी ठरवत भारतीय सैन्यदलाने पाकिस्तानच्या हवाई तळांवर असा जबरदस्त हल्ला चढविला की, पाकिस्तानचे राज्यकर्ते, लष्करशहा, चीनची लालभाई मंडळी हडबडून गेली. ‘‘ब्रह्मोस क्षेपणास्त्रांनी पाकिस्तानच्या ११ हवाई तळांवर तुफानी मारा केला. पाकिस्तानच्या ६ हवाई तळांवर हवेतून जमिनीवर मारा करणाऱ्या ब्रह्मोस क्षेपणास्त्रांनी लक्ष्य केले. भारतीय हल्ल्यात कोणतेही नुकसान झाले नाही’’ हा पाकिस्तानचा दावा वॉशिंग्टन पोस्टसारख्या जागतिक प्रतिष्ठित वृत्तपत्राने खोटा ठरवला आहे. भारतीय विमाने पाकिस्तानच्या हद्दीत १०० मैलांपेक्षा जास्त अंतरावर पोहोचली होती, असे वॉशिंग्टन पोस्टच्या वृत्तांकनात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. वॉशिंग्टन पोस्टने २७ उपग्रह छायाचित्रांची पडताळणी केली. त्याच्या आधारेच वॉशिंग्टन पोस्टने पाकिस्तानचा दावा खोटा ठरवला. वॉशिंग्टन पोस्टने पाकिस्तानच्या तीन महत्त्वाच्या एअरबेस हल्ल्यानंतरच्या स्थितीची माहिती आपल्या बातमीत दिली आहे. रावळपिंडीतल्या नूर खान एअरबेसवर पाकिस्तानची दोन नियंत्रण केंद्रे नष्ट झाली आहेत. नूर खान एअरबेसवरही मोठा हल्ला झाला, असे वॉशिंग्टन पोस्टने म्हटले आहे.

सहा एअरबेस, तीन हँगर्स, दोन रनवे आणि एअरफोर्सचे चार मोबाइल टॉवरचे नुकसान झाले, असे उपग्रहांद्वारे प्राप्त झालेल्या छायाचित्रांच्या आधारे वॉशिंग्टन पोस्टने म्हटले आहे. त्या आधी न्यूयॉर्क टाइम्सनेही भारताच्या ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानच्या हवाई तळांच्या झालेल्या नुकसानीबाबत वृत्तांकन केले होते. पाकिस्तानी लष्कराच्या मुख्यालयापासून आणि पंतप्रधान कार्यालयापासून सुमारे १५ मैल दूरवर असलेल्या नूर खान हवाई तळ, भारताने हल्ला केलेले सर्वात अवघड लष्करी लक्ष्य होते व रहीम यार खान एअरफील्ड, सरगोधा एअरबेस, जागारुर आणि सियालकोट एअरबेससारख्या स्थळांवर देखील भारताने हल्ले केले, असे न्यूयॉर्क टाइम्सने म्हटले होते.

१३ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंजाबमधील आदमपूर येथील हवाई तळाला भेट देऊन सैन्यदलाच्या जवानांशी संवाद साधला. हाच तळ नष्ट केल्याचा दावा पाकिस्तानने केला होता. त्याच तळाला भेट देऊन आणि तेथे सैन्य दलाच्या जवानांसमोर भाषण करून पंतप्रधान मोदी यांनी पाकिस्तानच्या खोटेपणाचा बुरखा टराटरा फाडला. यावेळी पंतप्रधान मोदींनी पाकिस्तानला आणि पाकिस्तानच्या मागे ताकद उभी करणाऱ्या सर्व शक्तींना खणखणीत इशारा दिला. ‘‘भारताने केवळ आपली लष्करी कारवाई पुढे ढकलली आहे. जर पाकिस्तानने पुन्हा दहशतवादी कारवाया किंवा लष्करी दुःसाहस दाखवले, तर आम्ही त्याला जशास तसे उत्तर देऊ. आमच्या अटी-शर्तींवर, आमच्या पद्धतीने उत्तर देऊ. आपण शत्रूला सतत जाणीव करून देत रहावे की, हा एक नवीन भारत आहे. या भारताला शांतता हवी आहे, पण जर मानवतेवर हल्ला झाला, तर युद्धाच्या आघाडीवर शत्रूचा नाश कसा करायचा हे देखील या भारताला चांगलेच माहीत आहे. पुन्हा दहशतवादी हल्ला केलात तर तुमचा विनाश होईल’’ इतक्या स्पष्ट शब्दांत भारताने पाकिस्तानला खडसावले आहे. त्यातून पाकिस्तानचे राज्यकर्ते खरेच धडा घेतात का हे भविष्यकाळात कळेलच. ‘‘पाकिस्तानने अण्वस्त्रांची भीती दाखवू नये. आम्ही त्याला भीक घालत नाही’’, हे पंतप्रधान मोदी यांचे आदमपूर येथील वक्तव्य बरेच काही सांगून जाणारे आहे. युद्धबंदी करत भारताने अमेरिकेची कथित मध्यस्थी मान्य केली, असा टाहो काँग्रेसच्या चेल्यांनी आणि मोदी विरोधकांनी फोडला होता. आपण भारत-पाक संघर्षात युद्धविराम घडवून आणला नाही, असे वक्तव्य करून डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतातल्या अनेकांची तोंडे बंद करून टाकली. सिंधू जल करार स्थगितच राहील, असे जाहीर करून भारताने पाकिस्तानला कोणतीही दयामाया दाखवली जाणार नाही, हेही दाखवून दिले आहे. त्या पाठोपाठ भारताने राजनैतिक पातळीवर आणखी एक मुत्सद्दी चाल खेळली आहे. दहशतवादाला प्रोत्साहन देण्यात पाकिस्तानची भूमिका, पहलगाम हिंदू नरसंहार आणि भारताच्या ऑपरेशन सिंदूरच्या यशाबद्दलची माहिती विविध देशांना देण्यासाठी मोदी सरकारने विविध पक्षांच्या खासदारांना वेगवेगळ्या देशांमध्ये पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेस नेते आणि माजी परराष्ट्र मंत्री शशी थरूर आणि असदुद्दीन ओवैसी यांच्यासह विरोधी पक्षांचे काही निवडक खासदार या मोहिमेचे नेतृत्व करणार आहेत. प्रत्येक पथकासोबत परराष्ट्र मंत्रालयाचा एक वरिष्ठ अधिकारी व अन्य सहकारी असणार आहेत. यामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणाला जगभरात व्यापक पाठिंबा मिळेल. राजकीय मतभेद ओलांडून देशहितासाठी भारत एकत्र असल्याचा संदेश जगाला दिला जाईल. ‘‘वीरः सदा जयत्येव, नृपतिः शूर एव च’’ राजाने आपल्या सैन्यदलाच्या मागे ठामपणे उभे रहायचे असते, असे सैन्य रणांगणावर कोणालाही पराभूत करते, असा या श्लोकाचा भावार्थ आहे. तूर्तास इतकेच.

# शिष्टमंडळांसमोरील आव्हान

**शिष्टमंडळांत आणखी कोण सदस्य असावेत, जम्मू-काश्मीरचे प्रतिनिधी किती असावेत, यांबाबतही वादविवाद होत आहेत. खरे तर प्रदीर्घ काळानंतर भारत अशा प्रकारची शिष्टमंडळे विविध देशांत पाठवीत आहे.**



पहलगाम दहशतवादी हल्ल्याचे कारस्थान घडवून आणणाऱ्यांना लक्ष्य करण्यासाठी राबविण्यात आलेली ‘ऑपरेशन सिंदूर’ ही मोहीम आणि त्यानंतर पाकिस्तानने केलेल्या हल्ल्यांना भारताने दिलेले प्रत्युत्तर यांबाबत जगभरात विविध देशांना माहिती देण्यासाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळे पाठविण्याची संकल्पना स्वागतार्ह आहे. पक्षीय मतभेद विसरून जगासमोर देशाची ठाम भूमिका मांडण्यासाठीचे हे पाऊल उचलून मोदी सरकारने ‘वयं पंचाधिकं शतम्’ असल्याचे दाखवून दिले आहे. मात्र, या शिष्टमंडळांतील सदस्यांच्या निवडीवरून सुरू असलेले राजकारण ‘वयं पंचाधिकं शतम्’मागील भावना दाखविणारे नाही. काँग्रेसचे खासदार शशी थरूर हे यांपैकी एका शिष्टमंडळाचे नेतृत्व करणार असून, त्यांची निवड ही या राजकारणाच्या मुळाशी आहे. या शिष्टमंडळांत आपल्या पक्षाचे कोण असावेत, यासाठीची विचारणा सरकारकडून काँग्रेससह अन्य पक्षांना झाली. त्यानंतर काँग्रेसने चौघांची नावे दिली; परंतु त्यात थरूर यांचे नाव नव्हते. असे असताना शिष्टमंडळात थरूर कसे, असा प्रश्न काँग्रेसकडून विचारला जात आहे. संयुक्त राष्ट्रांतील कामाचा थेट अनुभव, आंतरराष्ट्रीय राजकारणाचे ज्ञान; तसेच राजनैतिक चौकटीतील मांडणी या निकषांवर थरूर यांचा शिष्टमंडळातील समावेश रास्त ठरतो; परंतु अंतर्गत राजकारणामुळे काँग्रेसने त्यांना डावलल्याचे दिसते. केरळमध्ये होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीचा संदर्भही याला आहे. गेल्या काही महिन्यांपासून थरूर मोदी सरकारची भलामण करताना दिसत आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर मोदी सरकारने घेतलेल्या सर्व निर्णयांचे त्यांनी स्वागत केले होते; तसेच ह्यऑपरेशन सिंदूरह्नंतर त्यांनी आंतरराष्ट्रीय माध्यमांत भारताची बाजू भक्कमपणे मांडली होती. काँग्रेसने डावलण्यामागे ही कारणेही असू शकतात. थरूर यांची निवड करून सरकारने एक प्रकारे काँग्रेसवर कुरघोडी केली आहे. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताची बाजू मांडण्याचा विषय ओळखून काँग्रेसनेही थरूर यांना संधी दिली असती, तर अधिक चांगले झाले असते. या राजकारणामुळे सर्वपक्षीय शिष्टमंडळाची सुरुवात अडखळत झाली आहे. शिष्टमंडळांत आणखी कोण सदस्य असावेत, जम्मू-काश्मीरचे प्रतिनिधी किती असावेत, यांबाबतही वादविवाद होत आहेत. खरे तर प्रदीर्घ काळानंतर भारत अशा प्रकारची शिष्टमंडळे विविध देशांत पाठवीत आहे. एकूण सात शिष्टमंडळे पाठविली जाणार असून, थरूर यांच्याखेरीज रविशंकर प्रसाद, बैजयंत पांडा (भाजप), संजयकुमार झा (संयुक्त जनता दल), कनिमोळी करुणानिधी (द्रमुक), सुप्रिया सुळे (राष्ट्रवादी काँग्रेस ह्य शरद पवार) आणि श्रीकांत शिंदे (शिवसेना - शिंदे) हे देखील शिष्टमंडळांचे नेतृत्व करणार आहेत. पहलगाम हल्ल्यांनंतर पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी तळांवर हल्ले करून भारताने चोख प्रत्युत्तर दिले; त्यानंतर पाकिस्तानने शस्त्रसंधीसाठी पुढाकार घेतला. मात्र, त्यानंतरचा शस्त्रसंधी, आपण भूमिका बजावून अणुयुद्ध रोखल्याचा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा आणि या युद्धात आपलाच विजय झाल्याची पाकिस्तानची दर्पोक्ती यांमुळे भारताचे यश झाकोळून गेले आहे. प्रचारयुद्धात पाकिस्तानने आघाडी घेतल्याचे चित्र आहे. अशा स्थितीत भारताची भूमिका आणि कामगिरी प्रभावीपणे जगासमोर मांडण्याचे आव्हान या नेत्यांसमोर असेल. जम्मू-काश्मीरमध्ये कलम ३७० हटविल्यानंतरची परिस्थिती, तेथे वाढत गेलेले पर्यटन, रेल्वेसह होत असलेला पायाभूत विकास आणि दहशतवाद्यांकरवी पाकिस्तानने छेडलेले छुपे युद्ध यांबाबत जगाला तपशीलवार माहिती देण्याचे काम या शिष्टमंडळांना प्रभावीपणे करावे लागेल. ‘ऑपरेशन सिंदूर’नंतर भारताने जी पावले उचलली, तशीच पावले पाकिस्तानही उचलत आला आहे. भारताच्या मोहिमेची माहिती देण्यासाठी परराष्ट्र सचिवांसह सुरक्षा दलांच्या प्रतिनिधींची संयुक्त पत्रकार परिषद असो की पंतप्रधानांनी थेट हवाई तळावर जाऊन संबोधित करणे असो; पाकिस्तानने एक प्रकारे या सर्वांची भ्रष्ट नक्कल केली आहे. आता भारताने सर्वपक्षीय शिष्टमंडळ पाठविण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर पाकिस्तानही अशाच प्रकारची शिष्टमंडळे पाठविण्याचे ठरविले आहे.

# मुंग्यांची तस्करी

केनियामध्ये मुंग्यांची तस्करी करण्याच्या प्रयत्नांत असलेल्या बेल्जियमच्या दोन किशोरवयीन मुलांना नुकतीच शिक्षा झाली. तब्बल पाच हजार मुंग्यांसोबत सापडलेल्या या मुलांना सात हजार सातशे डॉलरचा दंड किंवा वर्षभराचा तुरुंगवास असा शिक्षेचा पर्याय देण्यात आला आहे. वन्यजीव संवर्धन कायद्याचे उल्लंघन केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. त्यांच्याकडे जायंट आफ्रिकन हार्वेस्टर अँट्स या मूळ आफ्रिकेमध्ये सापडणाऱ्या मुंग्या सापडल्या. त्या मुख्यत्वे झाडांच्या बिया गोळा करून जगतात. मुंग्यांचा रंग सुंदर लालसर काळा असतो. त्यांची राणी आकाराने अडीच सेंटीमीटर एवढी मोठी असते. तस्करांनी गोळा केलेल्या मुंग्यांना काचेच्या ट्युब्समध्ये भरून युरोप आणि आशियामध्ये पाठवून हजारो डॉलर्सला विकायचा त्यांचा बेत होता. अनेकांना या मुंग्यांना काचेच्या पेटीत बंदिस्त करून त्या घरं कशी बांधतात हे बघायला आवडतं. असे लोक या मुंग्या विकत घेतात. पण काचेच्या पेट्यांमध्ये बंदिस्त केल्यावर त्या तणावाखाली राहतात आणि त्यांच्या स्वभावामध्ये पण बदल घडून येतात. आत्तापर्यंत फक्त हत्ती, गेंडे, वाघ अशा मोठ्या प्राण्यांच्या तस्करीबद्दल आपण ऐकत आलो आहोत, पण मुंग्यांसारखे चिमुकले जीवही आता तस्करांच्या तावडीतून सुटत नाहीत. अशी तस्करी होते तेव्हा गंभीर पडसाद निसर्ग साखळीवर उमटतात. आफ्रिकेतील या हार्वेस्टर मुंग्या जमिनीखाली आकर्षक, खूप मोठी घरं बांधतात ज्यामुळे जमिनीखाली हवा खेळती राहते. त्या मोठ्या प्रमाणावर बिया त्यांच्या जमिनीखालच्या खोल्यांमध्ये साठवतात आणि या बियांची ने-आण करताना बीजप्रसार पण करतात. कितीतरी पक्षी या मुंग्यांना खातात. त्यामुळे या मुंग्यांचं महत्त्व खूप आहे.

